महाराष्ट्र स्वंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत...

## महाराष्ट्र शासन
### शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
### शासन निर्णय क्रमांक स्वयंअ-२०१३/(८५/१३) (II) /माशि-१

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०००३२
दिनांक : ५ ऑक्टोंबर, २०१३

संदर्भ :-

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - १, दिनांक ०४ जानेवारी, २०१३.
२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - ६, दिनांक १९ जानेवारी, २०१३.
३) शासन निर्णय क्रमांक पाशातु - १११२ / (२५८/२०१२) / प्राशि - ३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३
४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - ५, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३.
५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - ५७, ५८ व ५९, दिनांक २० एप्रिल, २०१३.
६) शासन निर्णय क्रमांक स्वयंअ - २०१३ / (८५/१३)/माशि - १, दिनांक १५ जून, २०१३
७) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक -२४, दिनांक २ जुलै, २०१३

**प्रस्तावना :-**

राज्यामध्ये दर्जेदार शिक्षण देण्यासाठी व शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाकरीता राज्य शासनाने कायम विनाअनुदानित तत्वावर नवीन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी " **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** " पारित केला आहे. या अधिनियमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ पासून करण्यात आली आहे. सदर अधिनियमाच्या अनुषंगाने नवीन शाळांना मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे इत्यादी साठी फेब्रुवारी, २०१३ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या ७,१०८ अर्जांची छाननी करुन दिनांक १५ मे, २०१३ रोजी २,४१७ प्रस्ताव पात्र करण्यात आले होते.

२. शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ साठी पात्र प्रस्तावांची छाननी करीत असतांना निदर्शनांस आलेल्या त्रुटी व प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी आलेल्या अडचणी यांचा विचार करता उक्त अधिनियमांच्या काही कलमांमधील तरतुदींमध्ये सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव दिनांक ०५

जून, २०१३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या सदर बैठकीत विभागाच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानुसार विधी व न्याय विभागाच्या सहमतीनंतर त्या संदर्भातील अध्यादेश मा. राज्यपालांच्या मान्यतेनंतर दिनांक ०२ जूलै, २०१३ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रख्यापित करण्यात आला आहे.

३. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ या अधिनियमातील तरतुदीनुसार सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता ज्या शैक्षणिक संस्थांनी नवीन शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी अर्ज दाखल केले होते. परंतू, अधिनियमातील तरतूदींच्या पुर्ततेअभावी त्यांचे प्रस्ताव अपात्र ठरले होते. अशा संस्थांच्या बाबतीत उपरोक्त अध्यादेशातील सुधारित तरतुदींची पूर्तता करुन प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या संदर्भात छाननी समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदवून त्याबाबतचे सुधारित प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी केली असता ८२८ एवढे प्रस्ताव पात्र करण्यात आलेले आहेत. या पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही कोणत्या पध्दतीने करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय:-

वरील पार्श्वभूमीवर सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता नवीन शाळा सुरु करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता छाननी समितीत्यांकडून कलम ६ (१) अनुसार प्राप्त झालेल्या जिल्हानिहाय अहवालाच्या अनुषंगाने उक्त अधिनियमातील विविध तरतूदी तसेच दिनांक ०२ जूलै, २०१३ च्या अध्यादेशामधील तरतूदींच्या अनुषंगाने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अन्वये सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी पुढीलप्रमाणे ८२८ प्रस्ताव पात्र म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

२) शाळा दर्जावाढीच्या **१९१** पात्र शाळांना शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ या वर्षापासून वर्ग सुरु करण्याबाबची परवानगी देण्यात येत आहे.

३) नवीन शाळांचे प्रस्ताव - वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या **६३७** नवीन शाळांना याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. प्रत्येक शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. (अल्पसंख्याक विना अनुदानित शाळा वगळून) त्याप्रमाणे उपरोक्त संबंधित पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापकांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींची पुर्तता करुन शाळा प्रथम मान्यतेसाठी संबंधित सक्षम अधिका-यांकडे एक महिन्याच्या कालावधीत अर्ज करावेत. संबंधित अधिका-यांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या

शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी (अल्पसंख्याक विना अनुदानित शाळा वगळून) व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

४) पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता पहिली पासून परवानगी देण्यात येईल.

५) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिंरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतूदींनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

६) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील (अल्पसंख्यांक विना अनुदानित शाळा वगळून) त्याचप्रमाणे महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यातील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

७) सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तपशीलानुसार नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेच्या दर्जावाढ करण्यास पात्र ठरलेल्या त्याचप्रमाणे अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्हयाच्या छाननी समितीच्या सदस्य सचिवांकडून संबंधित अर्जदाराला वैयक्तिकरीत्या कळविणे आवश्यक राहील व त्याची पोच शासन दप्तरी ठेवण्यात यावी.

८) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय DISE Data मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद / क्रमांक घेणे आवश्यक राहील. याबाबतची पुढील कार्यवाही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१००७११३७५८९६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Krishnrao Thube

Digitally signed by Prakash Krishnrao Thube
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prakash Krishnrao Thube
Date: 2013.10.14 16:26:50 +05'30'

(प्रकाश ठुबे)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
३. राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई
४. महासंचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय , मंत्रालय, मुंबई
५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
६. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषदा,
७. सर्व शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई(पश्चिम/उत्तर/दक्षिण)
८. मा.मंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
९. मा.राज्यमंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
१०. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
११. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
१२. उपसचिव, अर्थसंकल्प शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सर्व सह / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्तीमाशि-१

शासन निर्णय क्र.-स्वयंअ २०१३/(८५/१३)(III)/मशि-१, दिनांक :- ५ अक्टोबर २०१३ चे सहपत्र

| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा/ दर्जावाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १५० | पुणे | जागृती शिक्षण संस्था,वाकी | भैरवनाथ विद्या, वाकी बु. | मराठी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| १५१ | पुणे | नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ, तळेगाव दाभाडे | श्री छत्रपती विद्यामंदीर कान्हे | मराठी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| १५२ | पुणे | संत तुकाराम शिक्षण प्रसारक मंडळ, वडगांव | न्यु इंग्लिश स्कुल,टाकवे बु | मराठी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| १५३ | पुणे | साईबाबा चॅरिटेबल ट्रस्ट शिरगांव | आमदार प्रकाश देवळे विद्यालय, शिरगांव | मराठी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| १५४ | पुणे | रयत शिक्षण संस्था सातारा | सिद्धेश्वर हाय. को-हाळे बु. बारामती | मराठी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| १५५ | पुणे | योगिराज बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ चिखली हवेली | कै. सुरेश मोरे मा. व. उ.मा. विद्या गौरीनंदन | मराठी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| १५६ | पुणे | मावळ शिक्षण प्रतिष्ठाण तळेगाव स्टेशन | पद्मावती विद्यामंदिर, उर्से ता मावळ | मराठी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| १५७ | पुणे | भिमराव भोसले ट्रस्ट नेहरुनगर पिंपरी | प.वसंतदादा पाटील विद्यालय नेहरुनगर पिंपरी | मराठी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| १५८ | पुणे | सुलभ शिक्षण मंडळ पुणे | गोपाळ हायस्कुल पुणे | मराठी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| १५९ | पुणे | मदरसा इम दादुल मुस्लीम रुसोदीया दौंड | मदरसा इम दादुल मुस्लीम रुसोदीया दौंड | उर्दू | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| १६० | पुणे | ईश्वर एज्युकेशन ट्रस्ट भोसरी पुणे | संत साई हायस्कुल भोसरी पुणे | इंग्रजी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| १६१ | पुणे | सुभद्रा एज्युकेशन सोसा येरवडा | एस एन बी पी विद्यालय, राहटणी | इंग्रजी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| १६२ | पुणे | चलवादी शिक्षण संस्था विद्यानगर पुणे (CBSC) | विद्यानगर रोड १४ पुणे | इंग्रजी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| १६३ | पुणे | स्वामी विवंकानंद शिक्षण प्रसारक मंडह, मोशी ता. हवेली | गायत्री इं.ग्लिश मिडी. स्कूल गंधर्वनगरी | इंग्रजी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| १६४ | पुणे | बलवंत करतार आनंद फाऊंडेशन, कल्याणीनगर, पुणे | द लेक्सिकॉन इंटरनॅशनल स्कूल, कल्याणीनगर, पुणे | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १६५ | पुणे | चाकण शिक्षण मंडळ, चाकण, ता.खेड | नवोन्मेष प्रार्थामक विद्या मंदिर, आगरवाडी रोड, चाकण, ता.खेड | मराठी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १६६ | पुणे | मुक्तादेवी शिक्षण प्रसारक मंडळ (ट्रस्ट), आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे | ग्यान ज्योत इंग्लिश स्कूल, आळंदी देवाची, पद्मावती रोड, ता.खेड | मराठी | नवीन | पात्र | प्राथमिक |

GR copy

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र. ८१८/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांकः- ४ मे, २०१८

प्रस्तावना -

बलवंत करतार आनंद फाऊंडेशन, कल्याणी नगर, पुणे संचलित द लेक्सीकन इंटरनॅशनल स्कुल, कल्याणीनगर, पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत बलवंत करतार आनंद फाऊंडेशन, कल्याणी नगर, पुणे संचलित द लेक्सीकन इंटरनॅशनल स्कुल, कल्याणीनगर, पुणे या शाळेस (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इयत्ता १ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी बी. एस. ई. ) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहायित तत्वावर सुरु करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर संस्थेने संस्थेच्या नावाने एकूण ४० आर. जमिनीबाबतच्या ७/१२ चा अदययावत उतारा / खरेदी खत / नोंदणीकृत बक्षिसपत्र किंवा जमीन भाडेकरार (लिज) असल्यास ३० वर्ष कालावधीचा नोंदणीकृत भाडेकरार विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे ३ महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादापत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु

झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करुन या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्नेतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच; ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(७) **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / **दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित

केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरिता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(आ.ना. भोंडवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)